# प्रमुख नेमणुका

**Miss.Megha Satras**

**Rajyaseva 2024**

**(Dy. Director of Industries 2024)**

UPSC GUIDE
BY THE ACHIEVERS FOR THE ASPIRANTS

## ➢ अभिजात शेट:

केंद्रीय मंत्रीमंडळाने अभिजात शेट यांचे राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या( National Medical Commission) अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.

## ➢ नॅशनल मेडिकल काउन्सिल:

- स्थापना:२५ सप्टेंबर 2020
- मेडिकल काउन्सिल ऑफ इंडियाची जागा घेतली.
- उद्देश्य: वैद्यकीय शिक्षण, व्यवसायी संशोधन आणि संस्था यांचे नियमन करणे

## ➢ IGNOU – पहिल्या महिला कुलगुरू

- Uma Kanjilal यांची Indira Gandhi National Open University (IGNOU) च्या पहिल्या महिला कुलगुरू म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- IGNOU बद्दल:
- स्थापना – 1985
- मुख्यालय – New Delhi, India
- उद्दिष्ट: मुक्त आणि दूरस्थ शिक्षण (Open and Distance Learning) प्रणालीद्वारे शिक्षण उपलब्ध करणे.देशभरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी देणे.

## ➢ RPF च्या पहिल्या महिला महासंचालक:

- Sonali Mishra यांची Railway Protection Force (RPF) च्या महासंचालक (Director General) पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.
- त्या RPF च्या पहिल्या महिला महासंचालक ठरल्या आहेत.
- त्या Indian Police Service (IPS) च्या 1993 बॅचच्या अधिकारी आहेत.
- कॅडर – Madhya Pradesh

## ➢ PFRDA अध्यक्ष:

- शिवसुब्रह्मण्यम रामणन यांनी पेंशन फंड नियामक आणि विकास प्राधिकरणाचे (PFRDA)अध्यक्ष म्हणून पदभार स्विकारला.

## ➢ IRDAI अध्यक्ष:

- अजय सेठ भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाचे(IRDAI)अध्यक्ष म्हणून केंद्र सरकारने आर्थिक व्यवस्थेचे अजय सेठ यांची नियुक्ती केली आहे

## ➢ RAW प्रमुख नेमणूक:

Parag Jain यांची Research and Analysis Wing (RAW) च्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.ते वरिष्ठ Indian Police Service (IPS) अधिकारी आहेत.

## ➢ राष्ट्रीय वित्तीय अहवाल प्राधिकरण (NFRA) प्रमुख नेमणूक:

Nitin Gupta यांची National Financial Reporting Authority (NFRA) च्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

- NFRA बद्दल:
- स्थापना – 2018
- कायदेशीर आधार – Companies Act 2013

## ➢ डॉ. अजय कुमार – UPSC च्या अध्यक्षपदी

- Ajay Kumar यांची UPSC च्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.
- ही नियुक्ती Droupadi Murmu यांनी केली.
- डॉ. अजय कुमार हे 1985 बॅचचे IAS अधिकारी असून ते Kerala कॅडरचे आहेत.

UPSC GUIDE
BY THE ACHIEVERS FOR THE ASPIRANTS

## ➢ वित्तीय सेवा संस्था ब्युरो (FSIB) – प्रमुख नेमणूक

- **Bhanu Pratap Sharma हे Financial Services Institutions Bureau (FSIB) चे अध्यक्ष आहेत.**
- **केंद्र सरकारने त्यांच्या आणि इतर सदस्यांच्या कार्यकाळात आणखी एक वर्षाची वाढ केली आहे.**
- **FSIB स्थापना – 2022**
- **याने Banks Board Bureau (BBB) ची जागा घेतली**

## ➢ एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक (AIIB) – नवीन अध्यक्षा

- Zou Jiayi (चीनच्या माजी उप-अर्थमंत्री) यांची Asian Infrastructure Investment Bank (AIIB) च्या अध्यक्षा म्हणून 24 जून 2025 रोजी निवड झाली.
- त्या AIIB च्या पहिल्या महिला आणि दुसऱ्या अध्यक्षा ठरल्या.
- त्या विद्यमान अध्यक्ष Jin Liqun यांची जागा घेतील.
- त्यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ 16 जानेवारी 2026 पासून सुरू होईल.
- भ्रष्टाचाराविरोधातील कठोर भूमिकेमुळे त्यांना "Tiger Fighter" असे टोपणनाव मिळाले आहे.
- AIIB स्थापना – 16 जानेवारी 2016
- मुख्यालय – Beijing, China
- सदस्य देश – 100+ देश
- India हा संस्थापक सदस्य आहे.
- उद्दिष्ट: आशियातील पायाभूत सुविधा (Infrastructure) प्रकल्पांसाठी वित्तपुरवठा करणे

## ➢ सोळावा वित्त आयोग – नवीन अर्धवेळ सदस्य

- T. Rabi Sankar यांची 16th Finance Commission of India मध्ये अर्धवेळ (Part-time) सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- ते Reserve Bank of India (RBI) चे डेप्युटी गव्हर्नर आहेत.

## ➢ 16 वित्त आयोग :

- स्थापना – 31 डिसेंबर 2023
- अध्यक्ष – Arvind Panagariya
- सचिव – Ritvik Pandey
- पूर्णवेळ सदस्य:Annie George Mathew,Manoj Panda
- अर्धवेळ सदस्य:Soumya Kanti Ghosh,T. Rabi Sankar

## ➢ वित्त आयोगाचे मुख्य कार्य:

- केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये कर महसूल वाटपाचे सूत्र ठरवणे
- राज्यांना अनुदान देण्याबाबत शिफारसी करणे
- केंद्र-राज्य आर्थिक संबंध मजबूत करने

## ➢ संयुक्त राष्ट्र महासभा (UNGA) – नवीन अध्यक्षा

- Annalena Baerbock (जर्मनीच्या माजी परराष्ट्र मंत्री) यांची United Nations General Assembly (UNGA) च्या अध्यक्षपदी निवड झाली आहे.
- त्यांना 167 मते मिळाली.जिंकण्यासाठी 88 मतांची आवश्यकता होती.
- त्या Philemon Yang (कॅमेरूनचे माजी पंतप्रधान व विद्यमान UNGA अध्यक्ष) यांची जागा घेतील.
- त्या UNGA च्या पाचव्या महिला अध्यक्षा ठरल्या.

## ➢ UNGA :

- मुख्यालय –New York City, United States
- अध्यक्षपदाचा कार्यकाळ – 1 वर्ष
- अध्यक्षपद प्रादेशिक गटांनुसार (regional rotation) बदलत राहते.
- दरवर्षी सप्टेंबरमध्ये वार्षिक अधिवेशन आयोजित केले जाते.

## ➢ मुख्य कार्य:

- आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा, विकास, मानवी हक्क यांवर चर्चा व शिफारसी करणे UNSC व ECOSOC च्या सदस्यांची निवड
- Secretary-General of the United Nations यांच्या नियुक्तीत सुरक्षा परिषदेला शिफारस देणे

## ➢ अटल इनोवेशन मिशन – नवीन संचालक

- Deepak Bagla यांनी 21 जुलै 2025 रोजी Atal Innovation Mission (AIM) चे संचालक म्हणून पदभार स्वीकारला.
- Atal Innovation Mission हे NITI Aayog अंतर्गत कार्यरत आहे.
- AIM स्थापना – 2016
- उद्देश –देशात नवोन्मेष (Innovation) आणि उद्योजकता प्रोत्साहन देणे.

## ➢ संजय कौल – नियुक्ती:

Sanjay Kaul हे 1986 बॅचचे IAS अधिकारी असून ते केरळ कॅडरचे आहेत.

त्यांची गांधीनगर येथील GIFT City Company Limited चे व्यवस्थापकीय संचालक (MD) आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

GIFT City : Gandhinagar येथे स्थित असून भारताचे पहिले आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र (IFSC) म्हणून विकसित करण्यात आले आहे.

## ➢ डॉ. जेनिफर सिमन्स :

- Jennifer Geerlings-Simons यांची Suriname च्या संसदेच्या पहिल्या महिला अध्यक्षा म्हणून निवड झाली.
- त्या National Democratic Party या पक्षाच्या नेत्या आहेत.
- खंड : South America
- राजधानी : Paramaribo अधिकृत भाषा : डच (Dutch)

## ➢ संजोग गुप्ता :

- Sanjog Gupta यांची 7 जुलै 2025 रोजी International Cricket Council (ICC) चे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) म्हणून नियुक्ती करण्यात आली.ते ICC च्या इतिहासातील सातवे CEO ठरले आहेत.

## ➢ क्रिस्टी कोव्हेंट्री :

- Kirsty Coventry यांनी International Olympic Committee च्या पहिल्या महिला व पहिल्या आफ्रिकन अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारला आहे.
- त्या IOC च्या १०व्या अध्यक्ष ठरल्या आहेत.
- त्या माजी ऑलिंपिक जलतरणपटू असून त्यांनी अनेक ऑलिंपिक पदके जिंकली आहेत.
- २०१८ ते २०२५ दरम्यान त्यांनी Zimbabwe च्या क्रीडा मंत्री म्हणूनही काम केले आहे.

## ➢ अरुणाभ घोष :

- Arunabha Ghosh यांची COP30 साठी दक्षिण आशिया राजदूत (South Asia Ambassador) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- ही परिषद Brazil मध्ये आयोजित केली जाणार आहे.
- ते Council on Energy, Environment and Water (CEEW) या हवामान व ऊर्जा विषयक थिंक टँकचे प्रमुख आहेत.
- CEEW चे मुख्यालय New Delhi येथे आहे.

## ➢ न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई – 8 वा वेतन आयोग

- **Ranjana Prakash Desai यांची 8th Central Pay Commission च्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.**
- **ही नियुक्ती Narendra Modi यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाने केली.**
- **त्या वेतन आयोगाच्या पहिल्या महिला अध्यक्ष ठरल्या आहेत.**

## ➢ आयोगाची रचना:

- **अध्यक्ष – न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई**
- **अर्धवेळ सदस्य – Pulak Ghosh**
- **सदस्य सचिव – Pankaj Jain**
- **तत्त्वत: मंजुरी: जानेवारी 2025**
- **उद्देश: केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतन रचना व निवृत्तीवेतन लाभांबाबत शिफारसी करणे**
- **रचना: 1 अध्यक्ष + 1 अर्धवेळ सदस्य + 1 सदस्य सचिव**
- **कालावधी: स्थापनेपासून 18 महिन्यांत शिफारसी सादर करणे**

## ➢ आधीचा वेतन आयोग:

**7 th Central Pay Commission : Ashok Kumar Mathur (2014–2015)**

## ➢ न्यायमूर्ती रंजना देसाई :

- **शिक्षण: Elphinstone College येथून कला शाखेत पदवी (1970)**
- **1995 – Bombay High Court येथे सरकारी वकील**
- **2011 – Supreme Court of India न्यायाधीश**
- **2014 – सर्वोच्च न्यायालयातून निवृत्ती**

## ➢ इतर महत्त्वाची पदे:

- **Press Council of India – अध्यक्षा**
- **Jammu and Kashmir पुनर्रचना संदर्भातील Delimitation Commission – अध्यक्षा**
- **Uttarakhand साठी Uniform Civil Code मसुदा समिती – अध्यक्षा**

## ➢ विश्वास पाटील – मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष

- Vishwas Patil यांची 99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना च्या अध्यक्षपदी निवड झाली आहे.
- हे संमेलन सातारा येथे होणार आहे.
- संमेलनाचे आयोजन महाराष्ट्र साहित्य परिषद (शाहूपुरी शाखा) आणि मावळा फाऊंडेशन यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## ➢ साताऱ्यात झालेली पूर्वीची संमेलने:

- 3 वे (1905) – Raghunath Karandikar
- 44 वे (1962) – N. V. Gadgil
- 66 वे (1993) – Vidyadhar Gokhale

## ➢ विश्वास पाटील :

- शिक्षण: कायदा व इतिहास विषयात पदवी – Shivaji University
- माजी IAS (सनदी) अधिकारी
- प्रसिद्ध साहित्यकृती: संभाजी,पानिपत,महानायक,लस्ट फॉर लालबाग,पांगिरा,चंद्रमुखी

पुरस्कार:

- Sahitya Akademi पुरस्कार (1992) : “झाडाझडती” या कादंबरीसाठी.

## ➢ डॉ. नितीन करीर – महाराष्ट्र राज्य वित्त आयोग

- Nitin Karir यांची 6 th Maharashtra State Finance Commission च्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.
- ते महाराष्ट्राचे माजी मुख्य सचिव आहेत.ही जागा Mukesh Khullar यांच्या मृत्यूनंतर रिक्त झाली होती.

➢ नियुक्ती:

C. P. Radhakrishnan यांनी केली.

## ➢ राज्य वित्त आयोग :

- घटनात्मक तरतूद:
- Article 243-I – पंचायतींसाठी
- Article 243-Y – नगरपालिकांसाठी
- 73rd Constitutional Amendment Act आणि 74th Constitutional Amendment Act नंतर राज्य वित्त आयोग स्थापन करणे बंधनकारक झाले.

- **मुख्य कार्य:**
- **राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आर्थिक संसाधनांचे वाटप कसे करावे याबाबत शिफारसी करणे.**
- **दर पाच वर्षांनी राज्य वित्त आयोग स्थापन केला जातो.**
- **महाराष्ट्रातील काही पूर्वीचे वित्त आयोग:**
- **1ला – Makrand Herwadkar (1994–1997)**
- **4था – J. P. Dange (2011)**
- **5वा – Vishwanath Giriraj (2018)**

## ➢ मिथुन मनहास – BCCI अध्यक्ष

- **Mithun Manhas यांची Board of Control for Cricket in India (BCCI) च्या ३७व्या अध्यक्षपदी निवड झाली.**
- **ही निवड सप्टेंबर 2025 मध्ये BCCI च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत (AGM) झाली.**
- **त्यांनी Roger Binny यांची जागा घेतली.**
- **मनहास हे माजी दिल्ली कर्णधार आहेत.**
- **Sourav Ganguly आणि रॉजर बिन्नी यांच्यानंतर सलग तिसरे माजी क्रिकेटपटू BCCI अध्यक्ष झाले.**

## ➢ सुरेखा यादव :

- Surekha Yadav या आशियातील पहिल्या महिला लोको पायलट म्हणून प्रसिद्ध असून त्या निवृत्त झाल्या आहेत.
- निवृत्तीपूर्वी त्यांनी Rajdhani Express चे Igatpuri ते Chhatrapati Shivaji Maharaj Terminus या दरम्यान अंतिम संचालन केले.
- ही गाडी Hazrat Nizamuddin – CSMT मार्गावर धावते.

➢ शिक्षण : इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमध्ये डिप्लोमा

- 1988 – भारतातील पहिल्या महिला लोको पायलट
- 2023 – Vande Bharat Express (Solapur – Mumbai) च्या पहिल्या फेरीचे संचालन केले.

## ➢ न्यायमूर्ती प्रतिभा एम. सिंग : WIPO

- Prathiba M. Singh यांची 2025–2027 या कालावधीसाठी World Intellectual Property Organization (WIPO) च्या Advisory Board च्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.
- त्या Delhi High Court च्या न्यायाधीश आहेत.
- या मंडळाचे नेतृत्व करणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत.
- WIPO मुख्यालय – Geneva, Switzerland
- स्थापना – 1967
- ही संयुक्त राष्ट्रांची बौद्धिक संपदा (Intellectual Property) विषयक संस्था आहे.

## ➢ शांता रंगास्वामी – इंडियन क्रिकेटर्स असोसिएशन:

- Shantha Rangaswamy यांची Indian Cricketers' Association (ICA) च्या अध्यक्षपदी निवड झाली आहे.
- या पदावर निवड होणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत.
- 1976 मध्ये त्या India women's national cricket team च्या पहिल्या कर्णधार बनल्या.
- त्या कसोटी क्रिकेटमध्ये शतक करणाऱ्या पहिल्या भारतीय महिला क्रिकेटपटू आहेत.
- 1976 मध्ये त्यांना Arjuna Award मिळाला,हा पुरस्कार मिळवणाऱ्या त्या पहिल्या महिला क्रिकेटपटू ठरल्या.
- 2017 मध्ये Board of Control for Cricket in India (BCCI) कडून Life Time Achievement Award ने सन्मानित करण्यात आले.

## ➢ विवेक मेनन – IUCN Species Survival Commission

- Vivek Menon यांची 2025–2029 या कालावधीसाठी IUCN Species Survival Commission (SSC) च्या अध्यक्षपदी निवड झाली आहे.
- ही संस्था International Union for Conservation of Nature (IUCN) अंतर्गत कार्य करते.
- या पदावर निवड होणारे ते पहिले आशियाई व्यक्ती ठरले आहेत.
- विवेक मेनन हे प्रसिद्ध वन्यजीव संरक्षक व पर्यावरणतज्ज्ञ आहेत.
- ते Wildlife Trust of India चे सहसंस्थापक व कार्यकर्ते आहेत.

## ➢ शिवांगी सिंग – QFI बॅज

- Shivangi  Singh या Indian Air Force मधील स्क्वॉड्रन लीडर आहेत.
- त्या Qualified Flying Instructor (QFI) बॅज मिळवणाऱ्या भारताच्या पहिल्या महिला फायटर पायलट ठरल्या आहेत.

## ➢ दीपिका पदुकोण – मानसिक आरोग्य सदिच्छा दूत

- Deepika Padukone यांची 10 ऑक्टोबर 2025 रोजी Ministry of Health and Family Welfare तर्फे पहिल्या मानसिक आरोग्य सदिच्छा दूत (Mental Health Goodwill Ambassador) म्हणून नियुक्ती करण्यात आली.
- ही घोषणा World Mental Health Day निमित्त करण्यात आली.

## ➢ पी. व्ही. सिंधू : BWF Athletes’ Commission

- P. V. Sindhu यांची 2026–2029 या कालावधीसाठी Badminton World Federation (BWF) च्या Athletes’ Commissionवर नियुक्ती करण्यात आली आहे.
- त्या यापूर्वी 2017–2025 या कालावधीत BWF Athletes’ Commission ची सदस्य होत्या.
- 2020 पासून त्या BWF Integrity Ambassador म्हणूनही कार्यरत आहेत.

## ➢ Sanae Takaichi :

- यांची Japan च्या पंतप्रधान म्हणून निवड झाली.
- त्यांनी Shigeru Ishiba यांची जागा घेतली.
- त्या Liberal Democratic Party (LDP) च्या अध्यक्षा देखील आहेत.
- त्या जपानच्या पहिल्या महिला पंतप्रधान ठरल्या आहेत.

## ➢ प्रवीण कुमार : ITBP महासंचालक

**Praveen Kumar यांची Indo-Tibetan Border Police (ITBP) च्या महासंचालक (Director General) पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.**
**ITBP ही भारत-चीन सीमेचे संरक्षण करणारी केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (CAPF) आहे.**

## ➢ प्रवीर रंजन : CISF महासंचालक

**Praveer Ranjan यांची Central Industrial Security Force (CISF) च्या महासंचालक (Director General) पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.**

## ➢ क्रीती सेनन – UNFPA इंडिया मानद राजदूत

- **Kriti Sanon यांची United Nations Population Fund (UNFPA) इंडिया तर्फे लैंगिक समानतेसाठी मानद राजदूत (Honorary Ambassador) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**
- **या भूमिकेत त्या लैंगिक समानता, महिलांचे अधिकार आणि युवक सशक्तीकरण याबाबत जनजागृती करणार आहेत.**

## ➢ आर. वेंकटरमणी – भारताचे महान्यायवादी

- R. Venkataramani यांची Government of India तर्फे भारताचे महान्यायवादी (Attorney General for India) म्हणून पुढील दोन वर्षांसाठी फेरनियुक्ती करण्यात आली आहे.
- त्यांनी 2022 मध्ये K. K. Venugopal यांच्याकडून भारताचे 16 वे महान्यायवादी म्हणून पदभार स्वीकारला होता.

## ➢ पदाबद्दल:

- महान्यायवादी हे भारत सरकारचे सर्वोच्च कायदेशीर सल्लागार असतात.
- या पदाची तरतूद Article 76 मध्ये करण्यात आली आहे.

## ➢ उर्जित पटेल – IMF कार्यकारी संचालक

- **Urjit Patel यांची तीन वर्षांसाठी International Monetary Fund (IMF) चे कार्यकारी संचालक (Executive Director)म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**
- **ते यापूर्वी Reserve Bank of India (RBI) चे गव्हर्नर (2016–2018) होते.**
- **IMF मुख्यालय – Washington, D.C., United States स्थापना – 1944**

## ➢ राजीव रंजन – न्यू डेव्हलपमेंट बँक

- **Rajiv Ranjan यांची New Development Bank (NDB) चे उपाध्यक्ष (Vice-President) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**
- **त्यांची ५ वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली असून ते Chief Risk Officer म्हणूनही काम पाहतील.**

## ➢ न्यू डेव्हलपमेंट बँक :

- **स्थापना – 2014 (BRICS देशांनी स्थापन)**
- **मुख्यालय – Shanghai, China**
- **उद्देश – विकसनशील देशांमधील पायाभूत सुविधा व शाश्वत विकास**

## ➢ मिलिंद साठे : महाराष्ट्राचे महाधिवक्ता

- Milind Sathe यांची Maharashtra राज्याचे महाधिवक्ता (Advocate General) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- ही नियुक्ती Devendra Fadnavis यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाने मंजूर केली.
- त्यांनी Birendra Saraf यांच्याकडून पदभार स्वीकारला.

## ➢ थोडक्यात परिचय:

- ज्येष्ठ वकील; Bombay Bar Association चे माजी अध्यक्ष (2011–2013)
- 1982 मध्ये वकिली व्यवसायाची सुरुवात
- शिक्षण – B.Sc., LL.B.Brihanmumbai Municipal Corporation (BMC) साठी विशेष वकील म्हणून काम केले

## ➢ महाधिवक्ता (Advocate General) :

- तरतूद : Article 165
- नियुक्ती : राज्यपालांकडून
- कार्यकाल : राज्यपालांच्या मर्जीनुसार
- पात्रता : उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होण्यास पात्र असणे
- मुख्य कार्य : राज्य सरकारला कायदेशीर सल्ला देणे व कायदेशीर बाबींमध्ये प्रतिनिधित्व करणे

## ➢ ज्ञानेश कुमार – International IDEA अध्यक्ष

- Gyanesh Kumar यांनी 2026 साठी International Institute for Democracy and Electoral Assistance (International IDEA) चे अध्यक्षपद स्वीकारले आहे.
- या संस्थेत सुमारे 35 देश सदस्य आहेत.
- स्थापना – 1995
- स्वरूप – आंतरसरकारी संस्था (Intergovernmental Organisation)
- उद्देश – जगभरातील लोकशाही संस्था व निवडणूक प्रक्रिया बळकट करणे

## ➢ न्यायमूर्ती विक्रम नाथ – NALSA कार्यकारी अध्यक्ष

- **Vikram Nath यांची National Legal Services Authority (NALSA) च्या कार्यकारी अध्यक्षपदी (Executive Chairman) नियुक्ती करण्यात आली आहे.**
- **ही नियुक्ती Droupadi Murmu यांनी केली.**
- **परंपरेनुसार, Supreme Court of India मधील दुसऱ्या क्रमांकाचे वरिष्ठ न्यायाधीश NALSA चे कार्यकारी अध्यक्ष असतात.**

**➢ NALSA स्थापना :1995**

- **कायदा : Legal Services Authorities Act 1987**
- **उद्देश:**
- **समाजातील दुर्बल घटकांना मोफत व प्रभावी कायदेशीर मदत देणे.**
- **लोक अदालत द्वारे तडजोडीने प्रकरणे सोडवणे.**

## ➢ राजेश अग्रवाल – महाराष्ट्राचे मुख्य सचिव

- **Rajesh Aggarwal यांची नोव्हेंबर 2025 मध्ये Maharashtra राज्याचे मुख्य सचिव (Chief Secretary) म्हणून नियुक्ती करण्यात आली.**
- **त्यांनी Rajesh Kumar यांची जागा घेतली.**
- **ते 1989 बॅचचे IAS अधिकारी आहेत.**

## ➢ राजकुमार गोयल : मुख्य माहिती आयुक्त

**Rajkumar Goel यांना Droupadi Murmu यांनी Central Information Commission चे मुख्य माहिती आयुक्त (Chief Information Commissioner) म्हणून शपथ दिली. निवड समितीत : Narendra Modi, Amit Shah आणि Rahul Gandhi यांचा समावेश होता.त्यांच्यासोबत ८ नवीन माहिती आयुक्तांनाही शपथ देण्यात आली.**

## ➢ नवीन माहिती आयुक्त:

- **Suresh Vasant Meena,Ashutosh Chaturvedi,Swagat Das,Sudha Rani Relangi,P. R. Ramesh,Khushwant Singh Sethi,Jaya Varma Sinha,Sanju Kumar Jindal**
- **केंद्रीय माहिती आयोग (CIC)स्थापना : 12 ऑक्टोबर 2005**
- **कायदा : Right to Information Act 2005**
- **मुख्यालय : New Delhi**
- **रचना :1 मुख्य माहिती आयुक्त + जास्तीत जास्त 10 माहिती आयुक्त**

- **रामकृष्णन चंदर – LIC व्यवस्थापकीय संचालक**

**Ramkrishnan Chander यांनी Life Insurance Corporation of India (LIC) चे व्यवस्थापकीय संचालक (Managing Director) पद स्वीकारले आहे.**

- **विवेक चतुर्वेदी – केंद्रीय अप्रत्यक्ष कर व सीमा शुल्क मंडळाचे अध्यक्ष**

**Vivek Chaturvedi यांची Central Board of Indirect Taxes and Customs (CBIC) चे अध्यक्ष (Chairperson) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.ते 1989 बॅचचे IRS अधिकारी आहेत.**

- **सांटियागो नियेवा – भारतीय महिला बॉक्सिंग संघाचे मुख्य प्रशिक्षक**

**Santiago Nieva यांची Boxing Federation of India तर्फे भारतीय महिला बॉक्सिंग संघाचे मुख्य प्रशिक्षक (Head Coach)म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**

## ➢ क्रीती सुरेश – युनिसेफ इंडिया सेलिब्रिटी ॲडवोकेट

Kriti Suresh यांची UNICEF India तर्फे सेलिब्रिटी ॲडवोकेट (Celebrity Advocate) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.या भूमिकेत त्या बाल हक्क, शिक्षण, आरोग्य आणि बालसुरक्षा याबाबत जनजागृती करणार आहेत.

## ➢ तदाशा मिश्रा – झारखंड पोलिस महासंचालक

- Tadasha Mishra यांना Jharkhand च्या पोलिस महासंचालक (Director General of Police – DGP) पदाचा कार्यभार स्वीकारला आहे.
- त्या झारखंडच्या पहिल्या महिला DGP ठरल्या.
- त्या 1994 बॅचच्या IPS अधिकारी आहेत.

## ➢ अभय कुमार सिंग – रशियन फेडरेशनमध्ये पहिले भारतीय वंशाचे लोकप्रतिनिधी

Abhay Kumar Singh हे Russia मध्ये पदभूषवणारे पहिले भारतीय वंशाचे लोकप्रतिनिधी आहेत.ते पटना, बिहार येथील मूळ आहेत आणि कोर्स्क प्रादेशिक विधानसभेत डिप्युटी म्हणून काम करत आहेत.